महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
(An ISO 9001:2008 Certified University)
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253-2539100/300, Fax: 0253 2531836, Ph.: 2539219
Email: coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in
MUHS

डॉ. कालिदास द. चव्हाण
एम.बी.बी.एस., एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Kalidas D. Chavan
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations

जा. क्र. मआविवि/एक्स-६.२/ ७४०५ /२०१५

दिनांक ०७/११/२०१५

अतिमहत्त्वाचे

## अधिसुचना क्र.३९/२०१५

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलंग्नित पदवी नर्सिंग
महाविद्यालये

विषय :- बेसिक बी.एस्सी.नर्सिंग व पोस्ट बेसिक बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण करण्याची कालमर्यादा (Attempts)ठरविणेबाबत....

संदर्भ :- १)भारतीय नर्सिंग परिषदेचे दिनांक २९/१०/२०१४ रोजीची नियमावली
२)अभ्यासमंडळाची दिनांक ८/१०/२०१५ रोजीची बैठक

सर्व संलग्नित पदवी नर्सिंग महाविद्यालयांना कळविण्यात येते की, बेसिक बी.एस्सी.नर्सिंग व पोस्ट बेसिक बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रम पूर्ण करणेबाबत भारतीय नर्सिंग परिषदेची नियमावली विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून बेसिक बी.एस्सी नर्सिंग हया ०४ वर्षाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर सदरचा अभ्यासक्रम ०८ वर्षाच्या कमाल मर्यादेपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य राहील. तसेच शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून विद्यार्थ्यांनी पोस्ट बेसिक बी.एस्सी.नर्सिंग हया ०२ वर्षाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर सदरचा अभ्यासक्रम ०४ वर्षाच्या कमाल मर्यादेपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य राहील. वरील कालमर्यादा पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास संबंधित अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवता येणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विद्यार्थ्यांनी बेसिक बी.एस्सी.नर्सिंग किंवा पोस्ट बेसिक बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रथम वर्षाची नियमीत परीक्षा दिल्यानंतर अनुत्तीर्ण असल्यास त्याना व्दितीय वर्षाच्या वर्गात प्रवेश देता येईल मात्र प्रथम वर्ष सर्व विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यांना व्दितीय वर्षाच्या परीक्षेस प्रवीष्ठ होता येणार नाही.

विद्यार्थ्यांनी बेसिक बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रमाची व्दितीय वर्षाची नियमीत परीक्षा दिल्यानंतर अनुत्तीर्ण असल्यास त्यांना तृतीय वर्षाच्या वर्गात प्रवेश देता येईल मात्र व्दितीय वर्ष सर्व विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यांना तृतीय वर्षाच्या परीक्षेस प्रवीष्ठ होता येणार नाही.

विद्यार्थ्यांनी बेसिक बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रमाची तृतीय वर्षाची नियमीत परीक्षा दिल्यानंतर अनुत्तीर्ण असल्यास त्यांना चतुर्थ वर्षाच्या वर्गात प्रवेश देता येईल मात्र तृतीय वर्ष सर्व विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यांना चतुर्थ वर्षाच्या परीक्षेस प्रवीष्ठ होता येणार नाही.

शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पूर्वी प्रवेशीत नियमीत व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना दखील वरील नियम शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून लागू राहील.

तरी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमपूर्ण करणेबाबतची कालगणना महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी व त्याची खातरजमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रानुसार परीक्षा अर्ज सादर करावा. संबंधित माहिती संदर्भात भविष्यात काही त्रुटी आढळल्यास त्यासाठी संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सर्व संबंधित महाविद्यालयाने वरील नियमाचे तंतोतंत पालन करावे. तसेच सदरची अधिसूचना सर्व महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

परीक्षा नियंत्रक

सोबत:वरील प्रमाणे